# ‘ओरियंट इलेक्ट्रीकल्स’चे अनावरण

**पुणे, दि.२३**

वैविध्यपूर्ण भारतीय समूह सीके बिर्ला ग्रुपचा एक भाग ओरियंट इलेक्ट्रीकल्सने आपली नवीन ब्रँड ओळख ओरियंट इलेक्ट्रिकचे अनावरण केले. देशातील सर्वात जुना व पंख्यांचा सर्वात मोठा निर्माता ओरियंट भारतीय फॅन उद्योगातील महत्त्वपूर्ण कंपनी ते पुढील पिढीकरिता संकलित होम सोल्यूशन्स पुरवठादार बनण्याकडे वळत आहे, जो प्रामुख्याने स्मार्ट होम सोल्यूशन्सची महत्त्वाकांक्षा असणाऱ्यांकरिता उपाययोजना सादर करेल. सुधारित ग्राहक अनुभव प्रदान करण्यासह ओरियंट इलेक्ट्रीक सुंदर डिझाईन, ऊर्जा कार्यक्षम लायटिंग उत्पादने, फॅन्स व घरगुती उपकरणे अशा आपल्या विस्तृत शृंखलेसह ब्रँडचे सर्वोत्कृष्टतेच्या बाबातीतील आपले नाव अधिक उंचावण्याकरिता सज्ज आहे.

सीके बिर्ला ग्रुपचे अध्यक्ष सी के बिर्ला म्हणाले की, ओरियंट इलेक्ट्रीकने एक उत्पादन कंपनी ते जीवनशैली घरगुती उपाययोजना पुरवठादार म्हणून विकास साधला आहे. या एकत्रिकरणामुळे वापरकर्त्यांच्या नवीन पिढीच्या वाढत्या गरजांची पूर्तता करण्यामध्ये ब्रँड सक्षम होणार आहे. भौगोलिक विस्तार देखील ओरियंट इलेक्ट्रीकला उच्च विकसित आणि जगभरातील उदयोन्मुख बाजारक्षेत्रांमध्ये घेऊन जाणार आहे.

ओरियंट इलेक्ट्रीकचे मुख्यकार्यकारी अधिकारी मनोज वर्मा म्हणाले की, नवीन पुनस्थापनेसह आम्ही इन-



हाऊस निर्मिती आणि संशोधन व विकास क्षमतामध्ये वाढ केली आहे.

जेणेकरून कार्यक्षमता, सातत्य व सुरक्षिततेच्या उच्च मानकांसह उत्पादने आणि उपाययोजना सहजसाध्य पद्धतीने प्रदान करता येतील. आमची नवीन संकलित संपर्क मोहिम स्विच टू स्मार्ट जीवनशैलीत्मक व सोयीस्कर उपाययोजनांच्या शोधात असणाऱ्या चाणाक्ष ग्राहकांच्या पसंतीस उतरतील अशा उत्पादनांना मूर्त स्वरुप प्रदान करते.